## प्रकरण पाचवे

# मौलाना अबुल कलाम आझ़ाद यांचे फाळणीसंबंधी विचार

# प्रकरण ५

# मौलाना अबुल कलाम आझाद यांचे फाळणीसंबंधीचे विचार

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत ज्या प्रमुख देशभक्तांचा समावेश होतो त्यामध्ये मौलाना आझादांचे नांव उल्लेखनीय आहे. मौलाना आझाद हे मुस्लिम जातीचे होते. ज्या मुस्लिम नेत्यांनी कॉंग्रेसबरोबर राहून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले त्यामध्ये मौलाना आझाद हे एक आहेत. मौलाना आझादांची एक उच्च श्रेणीचे धर्मशिक्षक, वक्ता, बुध्दिमानी, उर्दु ग्रंथांचा प्रभू, एक राजकारणी व मुत्सद्दी म्हणून गणना केली जाते.

**प्रारंभिक जीवन (संक्षिप्त जीवनपरिचय) -**

मौलाना आझाद हे मुस्लिम समाजातील विद्वानांच्या, मौलवींच्या श्रेष्ठ वंदनीय घराण्यातील एक अपत्य होते. भारतात मुल्ला-मौलवींची जी सर्वश्रेष्ठ घराणी आहेत, त्या घराण्यांच्या वारसदारांनी कधी राजकारणात इतक्या हिरीरीने व सातत्याने भाग घेतलेला दिसत नाही. मौलानांचे घराणे इतिहासात सम्राट अकबराच्या काळापासून प्रसिध्द असणारे घराणे होते. परंपरेने मौलानांचे पूर्वज बंगालमध्ये धर्मगुरु म्हणून मानले गेले. हा बंगाल त्यावेळी इंग्रजांच्या ताब्यात गेला. त्यावेळी बंगालमधील मुस्लिम धर्मपंडितांनी इंग्रजी राजसत्तेच्या विरुध्द अनेकवार उठाव करण्याचे प्रयत्न केले. हे प्रयत्न करणाऱ्या मंडळीत फरादिया चळवळीत मौलानांचे पूर्वज होते.(१) मौलाना आझादांचे वडील मौलाना खेरुद्दीन हे आपल्या काळातील प्रसिध्द इमाम होते. त्याचे शिष्य भारताच्या विविध प्रांतात पसरलेले होते.

इंग्रजी राजवटीविरुध्द उलेमांनी जे संघर्ष केले त्याचा शेवट १८५७ सालच्या उठावणीत उलेमांनी केलेला उठाव व घेतलेला भाग हा होता. १८५७ चे शिपाईयुध्द संपल्यानंतर मौलाना खेरुद्दीन अधार्मिकाच्या हातात गेलेल्या भारताचा कायमचा त्याग करुन मक्केत राहण्यासाठी म्हणून गेले. एकटे

मौलाना खेरुद्दीनच असे गेलेले नव्हते. त्यांच्या बरोबर अनेक धर्मपंडित गेलेले होते, जे धर्मपंडित भारतात शिल्लक राहिले त्यांनी भारतात इ. स. १८६७ साली देवबंद या मुस्लीम धर्मपीठाची स्थापना केली. मेहंदी व वाहबी चळवळीचे वारसदार हे या देवबंदचे निर्माते, चालक व सुत्रधार होते. देवबंदचे हे धर्मपीठच जमेतूल उलेमाचे प्रमुख सामर्थ्यस्थान होते. जमेतुल उलेमाचे नेते व कार्यकर्ते देवबंदचे विद्यार्थी तरी असत किंवा शिक्षक तरी असत. आजही देवबंद हे धर्मपीठ उत्तर प्रदेशात चालू आहे. आणि मुस्लीम जातीयवादाचे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून काम करीत आहे. देवबंद या धर्म केंद्रांशी मौलाना आझादांचा संबंध वंशपरंपरेने होता. कारण देवबंदचे निर्माते मौलाना खेरुद्दीन यांच्यावर श्रध्दा ठेवणारे होते.

परगंदा मौलाना खेरूद्दीन मक्केत राहावयास गेले. तेथेच त्यांचे लग्न झाले. मौलाना आझादांचा जन्म खेरुद्दीन याचे पुत्र म्हणून मक्केत इ. स. १८८८ साली झाला. मोलाना आझादांच्या आईचे नाव अलियाह होते. प्रथेप्रमाणे त्यांची दोन नावे ठेवण्यात आली. एक तर सामान्य मुस्लिम म्हणून त्याचे नाव मोहियुद्दीन अहमद होते. पण हा माणूस सामान्य नव्हता. तो कलकत्याचा इमाम व मुस्लिम धर्मगुरुपीठाचा एक वारसदार होता. हे इमामपद लक्षात घेऊन फिरोजबख्त हे त्याचे दुसरे नाव ठेवण्यात आले. वाहावी व मेहदबी या चळवळी केवळ भारतीय स्वरुपाच्याच नव्हत्या, ती परंपरा सर्वत्र पसरलेली होती. या परंपरेतच मौलानांचे बालपण गेले. धर्मशिक्षण झाले. (२)

मौलानांच्या बालपणी त्यांनी मुस्लिम शिक्षण घेतले. हे धर्मशिक्षण घेऊनच ते लहानाचे मोठे झाले. लोकविलक्षण बुध्दीमत्ता आणि मुस्लिम धर्मशास्त्रातील पांडित्य यामुळे मौलाना आझाद हे आपल्या बालपणातच सर्व अरबस्तानमध्ये ख्यातनाम पंडित म्हणून मानले जाऊ लागले. मक्केतील मुल्ला, मौलवीची आपल्या मध्यवर्ती धर्मक्षेत्रात त्यांचा सत्कार करु 'विद्यावाचस्पती' म्हणजे 'अबुल कलाम' ही पदवी त्यांना दिली. त्यावेळी त्याचे वय अठरा वर्षाचे होते. मुस्लिम धर्मशास्त्रात नवव्या शतकातील अल बुखारीचे हदीस आणि

तेराव्या शतकातील आरंभाचा इसम फकरुद्दीन राझी याचा कुराण भाष्य हा ग्रंथ हे दोन ग्रंथ फार महत्त्वाचे मानले जातात. हिंदू धर्मातील मनुस्मृती आणि वेदाचे सायनभाष्य यांची जी प्रतिष्ठा आहे ती मुस्लिम धर्मात या दोन ग्रंथांची मानली जाते.(३) या दोन्ही ग्रंथांचे गाढे व्यासंगी आणि प्रभावी भाष्यकार म्हणून अबुल कलाम आझाद प्रसिध्द झाले. भारतीय धर्मपंडितांचेही प्रेम त्याच्याविषयी सारखे उचंबळून येत होते. मौलाना खेरुद्दीन यांनी परत भारतात यावे म्हणून कसोशीने प्रयत्न चालू होते. या प्रयत्नांना यश आले व खैरुद्दीन आपल्या दिग्विजयी, अलौकीक पुत्रासह भारतात आहे. १८९८ मध्ये मौलाना आझाद भारतात आले. त्यावेळी त्याचे वय अवघे दहा वर्षांचे होते.

इ. स. १८८५ साली अखिल भारतीय काँग्रेसची स्थापना झाली. ही स्थापना झाल्याबरोबर देवबंद या मुस्लीम धर्मपीठाने काँग्रेसला संपूर्ण पांठिबा आणि सहकार्य घोषित केले. मौ. आझाद भारतात आले त्यावेळी देवबंदने हिरीरीने काँग्रेसचा पुरस्कार करीत होती. जवळपास सर्व उलेमा काँग्रेसच्या पाठीशी होती. देवबंदशी मौलानाचा संबंध होता. ते ही मनाने इंग्रजांविरुध्द जिहादमध्ये सामिल झाले.

मौलाना आझाद भारतात आल्यानंतर त्यांनी इंग्रजीचा अभ्यास केला. आधुनिक विद्या आत्मसात केल्याशिवाय गत्यंतर नाही अशी मौलानांची पक्की खात्री होती. मौलाना आझादांनी १९१२ साली कलकत्यावरुन 'अल हिलाल' या नियतकालिकाचा प्रारंभ केला. अल हिलाल हे नियतकालिक उर्दु भाषेत निघत. या नियतकालिकाने सहा महिन्यातच अकरा हजारपर्यंत खप गेला. मौलानांच्या ज्वलज्जहाल लेखणीमुळे मुस्लीम मने पेटून उठलेली होती. हे ही नाकारण्यात अर्थ नाही. सगळया जगातील मुस्लीम राजकारणाचा ऊहापोह करणारे लेख, इंग्रज राजसत्तेविरुध्द चाललेला प्रक्षोभक प्रचार आणि कुराणाचे अधूनमधून भाष्य व भाष्यांतर ही अल-हिलालची वैशिष्टये होती. तरीही जे प्रेसवर छापले जाणारे नियतकालिक होते. लवकरच हे नियतकालिक सरकारने बंद पाडले आणि मौलानांना तुरुंगात घातले.(४) मौलाना पहिल्यांदा तुरुंगात

गेले त्याही वेळी ते काँग्रेसचे समर्थक होते पण अजून प्रत्यक्ष काँग्रेस पक्षात, राजकारणात भाग घेण्यास त्यांनी आरंभ केलेला नव्हता. तुरुंगातून सुटल्यानंतर मौलाना आझादांनी अल -बलाग हे नवे नियतकालिक सुरु केले. पूर्ण जोमाने ते खिलाफत चळवळीत सामील झाले. या चळवळीचे अखिल भारतीय चिटणीस झाले. वयाच्या पस्तीसाव्या वर्षी इ. स. १९२३ साली मौलाना अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष होते. तेंव्हापासून अखेरपर्यंत राष्ट्रीय मुसलमानांचे सर्वश्रेष्ठ नेते होते.

**आझादांचा राजकीय सहभाग -**

भारतीय राजकारणाच्या इतिहासात राष्ट्रीय मुस्लीमांचे प्रमुख प्रवक्ते म्हणून मौलाना अबूल कलाम आझाद यांचेच नाव घ्यावे लागेल. तसे पाहता मौलाना अबूल कलाम आझाद यांचे राष्ट्रीय नेतृत्व निष्प्रभ राहिले. तरी त्यांच्या जीवनाचा अभ्यास आधुनिक राजकारणात मुस्लीम समाजास राष्ट्रीय प्रवाहात खेचण्यात निश्चित साह्यभूत ठरला. विशेषत: १९२० सालानांतर त्यांच्यात जो मूलभूत व प्रचंड वैचारिक बदल घडून आला त्यामुळे त्यांचे जीवन अधिकच अभ्यासनीय झाले आहे.

सर सय्यद अहमद यांच्यानंतर भारतीय मुस्लिमांवर जबरदस्त प्रभाव असणाऱ्या प्रमुख व्यक्ती म्हणजे महमंद अली जीना, डॉ. इकबाल आणि मौलाना आझाद. या तिघांमध्ये मौलाना आझादांची विचारसरणी अधिक प्रभावी ठरली आणि त्यांचे प्रयत्न अधिक यशस्वी ठरले. राजकीय क्षेत्रांमध्ये त्यांचे कर्तृत्व अधिक निश्चित, स्पष्ट आणि शाश्वत ठरले. जुने आणि नवे असे सुशिक्षितांचे दोन गट जवळ आणण्यात मौलानांचे परिश्रम कारणीभूत ठरले. ते समान राष्ट्रीयत्व या कल्पनेच्या कट्टर पुरस्कर्त्यांपैकी प्रमुख नेते होते आणि मृत्युपर्यंत ते हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी झटणारे अग्रणी होते.(५)

भारतीय मुस्लीम समाजाचा अभ्यास करताना सर सय्यद अहमद खाँ यांचे नाव टाळणे अशक्य आहे. त्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात मुस्लीम समाजाला संप्रदायवादातून व अज्ञानाच्या अंध:कारातून आधुनिक शिक्षणाच्या प्रकाशात

आणण्यासाठी जिद्द बांधली. परंतु मौलाना आझाद हे सर सय्यद पेक्षा कणभर पुढे होते. शिक्षणाच्या बाबतीत आधुनिकतावादाचा पुरस्कार करीत असताना सर सय्यद यांनी राजकीय क्षेत्रात मात्र मुस्लीम समाजाची अस्मिता ब्रिटीश साम्राज्यवादाकडे गहाण ठेवली. सर्व अलिगढवादी विचारसरणीच्या लोकांनी सर सय्यद यांचीच री ओढली. मौलाना अबुल कलाम आझाद यांच्यावर सर सय्यद यांच्या आधुनिक शिक्षणवादाचा पगडा अवश्य होता. परंतु राजकीय क्षेत्रातील सर सय्यदांची ब्रिटीश मक्तेदारी त्यांना मान्य नव्हती. अलिगढ विद्यापीठाचे चिटणीस यांनी इस्लानची तलवार सदैव ब्रिटीश राजवटीच्या सेवेस तत्पर असे जे निवेदन केले होते त्या धोरणास मौलांना आझाद यांनी प्रारंभापासून विरोध केला होता. मौलाना आझादांवर सर सैय्यद अहमदखान यांचा खूप प्रभाव पडला होता. हा प्रभाव त्यांच्या विचारांना कलाटणी देणारा होता. पारंपारिक अनुकरणप्रियतेची बंधने गळून पडली. पण त्यांच्यासमोर अनेक नवीन प्रश्न निर्माण होऊन त्यांचे मानसिक स्वास्थ्य डळमळीत झाले. त्यांनी पूर्वी मिळविलेले धार्मिक ज्ञान आणि सर सैय्यद अहमद खान यांच्या प्रभावामुहे मिळालेले ज्ञान यामधील तफावत लक्षात घेऊन हे वैचारिक वादळ त्यांच्या मनात निर्माण झाले असावे. सर सैय्यद अहमद खान याचें विचार व मुसाजितावाल्यांचे विचार सारखेच होते. परंपरेने आलेल्या मूल्यांचा अंधपणे स्वीकार न करता विद्वानांच्या समूहाने संदर्भानुरूप मूल्यांना नवीन अर्थ प्रदान करणे म्हणजे मुताजिला. रिदा, अब्दुहसारख्या विचारवतांचा प्रभाव आझादांवर पडला. परदेशीय मुसलमान विचारवंतांच्या प्रेरणेमुळे भारतीय मुस्लिम हिंदूंच्या जवळ यावयास मदत झाली.(६)

भातीय इस्लाममध्ये आझाद हे क्रांतीकार धर्मपंडित व तत्त्वचिंतक म्हणून ओळखले जातात. त्याचबरोबर भारतीय राजकारणात ते तेवढचे एकरुप झाले होते. मुस्लीम समाजाने राष्ट्रीय जीवन प्रवाहापासून मुळीच विलग होता काम नये असा कटाक्षाने त्यांनी वेळोवेळी आग्रह धरला. दुर्देवाने भारतीय राजकारणात त्याचा प्रभाव मुस्लीम समाजावर जास्त पडल्याचे दिसून येत

नाही. याला कारण म्हणजे ते मुळात राजकारणी नव्हते. परिस्थितीने त्यांना राजकारणात खेचले व प्रमुख नेत्यांत त्यांची गणना होऊ लागली. मनाने मात्र ते पंडित व चिंतक होत राहिले.

श्री. सी. राजगोपालचारी यांच्यासारखा महान नेता आझादांची तुलना सम्राट अकबरांशी करतात. यात वावगे काही नाही. राजगोपालचारी यांच्या मते, "आझादांची उदार मते बहुसंख्य मुसलमानांना मान्य होणार नाहीत. सम्राट अकबरालासुध्दा त्यांच्या स्वधर्मीयातून अनुयायी मिळू शकले नाहीत. तेव्हा मौलाना आझादांना संघटित मुस्लीम वर्गाकडून प्रतिसाद मिळत नाही याबद्दल खेद वाटण्याचे काहीच कारण नाही असे राजगोपालचारी म्हणतात."(७)

सर सय्यद अहमदखान (१८१७ ते १८९८) यांच्यानंतर इकबाल (१८७३ ते १९३८), जिना (१८७९ ते १९४९) व मौलाना आझाद या त्रयींचा भारतीय मुस्लीमांवर फार मोठा प्रभाव पडला. इकबाल व जीना यांनी राजकीय क्षेत्रात प्रवेश केला तो राष्ट्रवादी मुसलमान म्हणून ते पहिले भारतीय होते व नंतर मुसलमान परंतु त्यांचे राजकीय जीवन राष्ट्रवादी मुस्लीम म्हणून संपले. उलटपक्षी आझादांची मुस्लीम बुध्दीवादी जगात प्रवेश केला. तेव्हा ते मुस्लीम राष्ट्रवादी होते (१९०६ ते १९२०). हिंदूंबरोबर राजकीय तडजोड करणे त्यांना अमान्य होते पण त्यांनी आपले जीवन संपविले तेंव्हा ते भारतीय राष्ट्रवादी होते, पाकिस्तानशी काडीइतकेही प्रेम त्यांना वाटत नव्हते.

आझादांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात धार्मिक नेता म्हणून केली. त्यांची राजकीय मते दोन भागात विभागता येतील. पहिल्या भागात १९०६ ते १९२० पर्यंतची त्यांची मते समाविष्ट होतात. आपल्या राजकीय जीवनाच्या सुरुवातीला ते कट्टर मुस्लीम राष्ट्रवादी होते. या काळात मुस्लिमेत्तरांशी अगदी राजकीय बबींसाठीसुध्दा संबंध ठेवायला ते तयार नव्हते. सर सय्यदच्या लिखाणाने प्रभावित होऊन आझादांनी १९०६ च्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात उपस्थित राहून राजकारणात प्रवेश केला. परंतु त्याच्या

बंडखोर मनोवृत्तीमुळे ते सर सय्यदचे अनुयायी पाठिंबा होऊ शकले नाहीत. ब्रिटीश सरकारला सातत्याने पाठिंबा देण्याचे सर सय्यदांचे धोरण आझादांना रुचले नाही. ब्रिटीश सत्तेविषयी मुस्लिमांच्या मनात असलेली राजनिष्ठेची भावना काढून टाकण्याचे त्यांनी ठरविले. आझादांचे वृत्तपत्रातील लेखन मुस्लीम जागृतीसाठी होते. इस्लाममधील बाहेरुन आलेल्या अनिष्ठ रुढी काढून टाकण्यासाठी त्यांनी प्रस्तुत माध्माचा उपयोग केला. स्त्रियांना संतुलित स्वातंत्र्य देण्याची शिफारस केली. १९१२ मध्ये त्यांनी कलकत्ता येथून 'अल हिलाल' नामक साप्ताहिक सुरु केली. साप्ताहिकाने मुस्लिमांच्यात वैचारिक स्फोट घडवून आणला. आझादांनी अल हिलालद्वारे जे संदेश मुस्लीम समाजाला दिले त्याच्यामागे दोन हेतू होते. एक म्हणजे धर्माची खरी तत्त्वे मुस्लीमांमध्ये पसरवून धार्मिक आणि सामाजिक जीवनाची पुनर्रचना करणे व दुसरे म्हणजे स्वातंत्र्य ही कल्पना रुजवून स्व-बांधवांना स्वतःचे सरकार स्थापन करण्यासाठी कॉंग्रेसशी सहकार्य करण्यास प्रवृत्त करणे(८) आझादांचे वृत्तपत्रातील लेखन मुस्लिम जागृतीसाठी होते. इस्लाममधील बाहेरुन आलेल्या अनिष्ट रुढी काढून टाकण्यासाठी त्यांनी प्रस्तुत माध्यमाचा उपयोग केला. स्त्रियांना संतुलित स्वातंत्र्य देण्याची शिफारस केली.

अल हिलाल नंतर आझादांनी १९१६ मध्ये अल बलाग नावाचे दुसरे साप्ताहिक सुरु केले. या साप्ताहिकातील लिखाणाने त्यांनी मुस्लिम समाजात बुध्दीवादी व साहित्यीक वातावरण तयार केलेच पण धर्म व राजकारण याबाबतीत जागृती निर्माण केली. या काळातील आझादांचे राजाकरण चमत्कृती व उत्साह यांनी भरले होते खरे, परंतु याच कालखंडात ते मुस्लिम बांधवांमध्ये तत्कालीन राजकारणातील घडामोडी विषयी आशा व राजकारणातील स्वातंत्र्याविषयी अभिलाषा निर्माण करण्यात यशस्वी झाले हे नाकारता येणार नाही. आणखी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, त्यांचे समकालीन उलेमा ब्रिटीशांशी एकनिष्ठ होते तर याउलट भारताला स्वातंत्र्य मिळवायचे

असेल तर ते भारतीयांची मिळविले पाहिजे. त्यासाठी परकीयांची मदत नको, अशी आझादांची भूमिका होती. (९)

१९०६ ते १९२० च्या कालखंडात आझादाचे राजकारण मुस्लिम राष्ट्रवादाचे राजकारण होते. त्यानंतर म्हणजे १९२० सालानंतर मात्र आझादांच्या विचारसरणीत मूलभूत बदल होऊ लागला. संरक्षण कायद्याखाली त्यांना बंगालमधून हद्दपार करण्यात आल्यामुळे त्यांना रांचीमध्ये राहावे लागले. पुढे त्यांना तेथे नजरकैदेत ठेवण्यात आले. त्या काळात जालियनवाला बागेतील हत्याकांड व संपूर्ण पंजाबमध्ये पुकारण्यात आलेला मार्शल लॉ यांच्यामुळे सारा देश पेटला होता. तुर्कस्तान सम्राटाबरोबर इंग्लंडने वैर धरले होते. त्यामुळे मुसलमान बिथरले होते. याचाच परिणाम खिलाफत चळवळ सुरु करण्यात झाला. या चळवळीचा फायदा घेवून आझादांनी हिंदु-मुसलमानांना एकत्र आणण्याचे ठरविले आणि दोन्ही जमातींनी खांद्याला खांदा लावून ब्रिटीशांविरुध्द लढा द्यावा म्हणून प्रयत्न सुरु केले. त्यासाठी त्यांनी गांधीजींना विश्वासात घेतले. गांधीजींनी खिलाफतची मागणी राष्ट्रीय पातळीवर करण्यासाठी कॉंग्रेसचे मन वळविले. आझादांच्या राजकीय आयुष्यातील दुसरा मोठा विजय या काळातील त्यांच्या भाषणांनी व लेखांनी मुस्लिमांमध्ये राष्ट्रीय ऐक्याविषयी उत्साह निर्माण केला. मुस्लिमांनी प्रचंड संख्येने कॉंग्रेसच्या कार्यक्रमात सहभागी होण्याचा इतिहासातील हा पहिलाच प्रसंग होता. देशात सर्वत्र हिंदू-मुस्लिम की की जय ही घोषणा ऐकू येऊ लागली. १९२० नंतर आझाद मुस्लिम राष्ट्रवादी राहिले नाहीत. त्यांनी अरब व तुर्कस्तानची निधर्मी व प्रादेशिक भूमिकेवरुन पुढे आलेली राष्ट्रीयत्वाची मूलभूत तत्त्वे स्वीकारली व त्यांचा वापर भारतीय राजकारणात करायला सुरूवात केली.(१०)

अशाप्रकारे पहिले महायुध्द संपल्यानंतर व खिलाफतीचे विसर्जन झाल्यानंतर आझादांची मते आमूलाग्र बदलली. इस्लाम राष्ट्रवादाची कल्पना सोडून देऊन त्यांनी भारतीय राष्ट्रवादाला जवळ केले.

अखिल भारतीय खिलाफतच्या २४ डिसेंबर १९२५ ला कानपूर येथे भरलेल्या संमेलनातील आझादांचे भाषण म्हणजे त्यांच्या मतपरिवर्तनाचे प्रतिक होय. अशाप्रकारे मुस्लिम राष्ट्रवादाचा कट्टा पुरस्कर्ता तुर्कस्तानी राष्ट्रवादाने प्रभावित झाला. आणि मागचे विचार टाकून त्यांनी हिंदू-मुसलमानांच्या समान राष्ट्रीयत्वाचा प्रचार करायला सुरुवात केली. कमाल अनुयायांनी खिलाफत विसर्जित केली. त्याबद्दल आझादांनी एका शब्दानेही मनस्ताप व्यक्त केला नाही. ही एकच गोष्ट ते आता धर्म-राष्ट्रवादी उरले नाहीत हे दाखवून देते. ब्रिटीश वसाहतवादाविरुध्द लढण्यासाठी हिंदू - मुस्लिमांनी एकत्र यावे या दृष्टिकोनातून आझाद खिलाफत चळवळीकडे पाहू लागले.(११)

### हिंदू - मुस्लीम ऐक्य -

फाळणीला ज्या चिकाटीने व जिद्दीने आझादांनी विरोध केला त्यावरून एकात्म भारताची त्यांची तळमळ दिसून येते. हिंदू - मुस्लिम हे एका राष्ट्रीय प्रवाहाचे साथीदार आहेत व त्यांनी वेगळे न होता एकत्र बसूनच परस्पर समझोत्याने व विश्वासाने आपले भाग्य घडवावे हाच सूर आझादांनी आपल्या प्रत्येक विचारातून व कृतीतून लावला होता. प्रत्यक्षात यासाठी ते फार काही करु शकले नाहीत. हे जसे त्यांचे अपयश आहे, त्याही पेक्षा जास्ते ते धर्मनिरपेक्षवादी नेतृत्वाचे अपयश होते. १९१२ ते १९२० च्या काळात आझाद इस्लामी राष्ट्रवादाने भरभरटलेले होते. खिलाफत चळवळीच्या अपयशाने त्यांचे डोळे खाडकन उघडले व त्यावेळेपासून त्यांनी इस्लामी राष्ट्रवादाची कास सोडून दिली आणि भारतीय राष्ट्रवाद कवटाळला. ब्रिटीशांकडून भारताचे स्वातंत्र्य काबीज करण्यासाठी हिंदु-मुस्लिमांना एकात्म राष्ट्रवाद ही पूर्व अट आहे असा त्यांनी आग्रह धरला.

आझादांना मुस्लिम समाजाचा स्वभावधर्म चांगला परिचित होता. कुराण व हदिस यांची मुस्लिम मनावरील घट्ट पकड त्यांनी ओळखली होती. त्यामुळे मुस्लिम समाजाची आधुनिकीकरणाची प्रक्रियाच थोपविली गेली आहे हे ही ते ओळखून होती. म्हणून आपल्या 'तरजुमानल कुराण'द्वारे त्यांनी मुळालाच हात

घातला. कुराणवर त्यांनी अत्यंत उदारमतवादी असे भाष्य केले. दीन आणि मजहब यातला भेद स्पष्ट करण्याचा प्रयत्न करुन धर्मातल्या परंपरेची व अंधश्रध्देची पकड ढिली करण्याचा प्रयत्न केला. इस्लामच केवळ सर्वश्रेष्ठ नसून सर्व धर्माची मूलतत्वे सारखीच असल्यामुळे सर्व धर्म समान आहेत असे त्यांनी मानले. ईश्वराची प्रार्थना करण्याच्या व जीवन जगणाच्या पध्दती वेगवेगळया असू शकतात आणि त्यापुढेही सर्व मानव जात एक असू शकते हे पटवून देण्याचा प्रयत्न केला.(१२)

आझाद म्हणाले, "स्वर्गातून देवदूत जरी खाली उतरला व कुतुबमिनाराच्या शिखरावरुन त्याने मला सांगितले की हिंदु - मुस्लीम ऐक्याचा नाद सोड, चोवीस तासात स्वराज्य तुझ्या मालकीचे होईल तरी मी प्राणाहून प्रिय असलेले स्वराज्य दूर ढकलीन व हिंदु - मुस्लीम ऐक्याच्या भूमिकेवविषयी तसूभरही ढळणार नाही. कारण स्वराज्य नाकारल्यामुळे केवळ भारताचे नुकसान होईल पण हिंदु - मुस्लीम ऐक्य नाकारल्यास अखिल मानव जातीचे भयंकर नुकसान होईल."(१३)

अरब राष्ट्रवादाचा प्रभाव आझादांवर फार मोठया प्रमाणावर झाला होता. २९ डिसेंबर १९२५ रोजी कानपूर येथील खिलाफत परिषदेत भाषण करताना त्यांनी मध्य पूर्व अरब राष्ट्रांमध्ये घडत असलेल्या राजकीय घटनाचा आढावा घेतला. नंतर त्यांनी ऐक्याऐवजी हिंदू - मुस्लिमांच्या जातीय दंगली देशात थैमान घालीत आहेत, या गोष्टीचा धिक्कार केला. ते म्हणाले, 'मध्य-पूर्व आशियातील राष्ट्रे राजकीयदृष्टया झपाटयाने प्रगती करु घेत असताना भारतीय राजकारणाने मात्र प्रतिगामी वळण घेतले आहे. भारताप्रमाणेच सिरियातील जनता बहुधर्मी आहे. शतकानुशतके त्यांची आपसात भांडणे होत असत, रक्तपात होत असत. पण आज सर्व सिरियन जनता आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी संघटीत झाली आहे व त्यांचे म्हणणे असे आहे की, आमच्यात आपसात धार्मिक मतभेद असू शकतील, पण आमचा देश हा सर्व सिरियन बांधवांसाठीच आहे.' भारताची तुलना सिरियाशी करताना ते म्हणाले की

भारतातील सुशिक्षित व पुढारलेला वर्गसुध्दा सिरियाच्या राष्ट्रवादाच्या या सकल्पनेपर्यंत पोहचू शकला नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. धार्मिक अंधश्रध्दा, जातीय संघर्ष आणि दुषित पूर्वग्रह या गोष्टींनी राष्ट्राच्या प्रगतीच्या वाटा रोखून धरल्या आहेत.(१४)

सामान्य माणसाच्या आशा-आकांक्षांकडे लक्ष न दिल्यामुळे आझाद केवळ पोथीनिष्ठ बुध्दिवादी ठरले. तरीदेखील त्यांना आशा होती की खिलाफत चळवळीत जसा पाठिंबा मिळाला तसा पाठिंबा शेवटपर्यंत त्यांना मिळू शकेल. पाकिस्तानी राष्ट्रवादाकडे ओढल्या जाणाऱ्या जनतेची नाडी ओळखण्याचा प्रयत्न आझादांनी कधीच केला नाही. १९४० साली लाहोर येथे मुस्लिम जनता जीनांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तान निर्मितीचा ठराव करीत असताना आझाद त्याच वर्षीच्या रामगढ येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणात एकसंघ राष्ट्रचाच पुरस्कार करीत होते.' मी मुसलमान आहे आणि मुसलमान होण्याचा मला अभिमान आहे. माझ्या वंशावळीत इस्लामची १३०० वर्षांची पूर्वपरंपरा लाभलेली आहे. मी यासाठी कदापि तयार होणार नाही की यातील एक ही अंश व्यर्थ जाईल. इस्लामची तालीम, इस्लामची तारीख, इस्लामची ज्ञानगाथा, कला, इस्लामचा आदर या गोष्टींना माझ्या जीवनाचा अति उच्च बिंदू आहे आणि माझे कर्तव्य आहे की मी याचा सन्मान राखू शकेन. मुसलमान होण्याचा धार्मिक व सांस्कृतिक बंधनामध्ये मी खास भूमिका पाळतो आणि यामध्ये झालेला हस्तक्षेप मी कदापि मान्य करणार नाही. परंतु या जाणीवेबरोबरच आणखी एक जागीव राखतो की जीणे माझे जीवन बनविले इस्लामचा आत्मा मला यापासून वेगळे करु शकत नाही आणि तिच्या मार्गात मी वाहत जातो. मी ती सन्मानाने अनुभूत करतो की मी भारतीय आहे. भारतीय राष्ट्रीयत्त्वाचे जे अविभाज्य ऐक्य आहे त्याचा मी एक घटक आहे. भारतीय राष्ट्रीयत्वाचे स्वप्न साकार करणारे जे काही महान शिल्पकार आहेत त्यातलाच मी ही एक आहे, ही शिल्पकारित्वाची जाणीव माझ्यात असून हा महान हक्क मी कदापि सोडू शकणार नाही, असे आझादांनी घोषित केले. (१५)

हिंदू - मुस्लीम ऐक्य साधण्यासाठी व जातीय समस्या योग्य रितीने सोडविण्यासी जे अनेक अडसर आहेत त्यापैकी मुस्लीम समाजाचा चूक भूमिकेवर आधारलेला एक गैरसमज फार मोठा अडसर आहे. मुस्लीम समाज राजकारणासह सर्व क्षेत्रात स्वतःला अल्पसंख्यांक समजून बसतो, त्याचा बाऊ करतो. त्यामुळे तो समाज विभक्तवादाच्या आहारी जाते आणि त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणून त्या समाजाची सुधारणाच खुंटू लागते. मुस्लीम समाज प्रत्यक्षात न्यूनगंडाचा बळी झाला आहे. पण मानसिकदृष्टया मात्र मात्र श्रेष्ठत्वाच्या गंडांचा अभ्यास निर्माण करीत असतो. आर्थिक व सामाजिकदृष्टया हा समाज अजूनही आधुनिकवादी प्रगतीच्या पथावर दिसून येत नाही. त्याचे ऐहिक जीवन सापेक्षतेने हीणकस असे आहे. असे असूनही मानसिकदृष्टया मात्र ही वस्तुस्थिती ते ओळखू इच्छित नाहीत.(१६)

आपला समाज कधी काळी राज्यकर्ता होता या मोठेपणाच्या व आपला धर्म सर्वश्रेष्ठ आहे या अहंमन्यतेच्या आहारी हा समाज गेल्याचे दिसून येते. यातून एक वेगळेपणाची भावना निर्माण होवून हा समाज राष्ट्रीय जीवन प्रवाहापासून अलगच राहू पाहात आहे. असे असल्यास देशाची एकात्मता ती कशी साधली जाणार? आजच्या क्षणालाही भारताला सेक्युलर व आधुनिकतावादी करण्यात हीच अडचण येत आहे. नेमक्या याच नाजूक प्रश्नावर आझाद यांनी आपल्या रामगढ काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषाणात बोट ठेवले व त्याचे मार्मिक विवेचन केले आहे. आजही सेक्युलरवाद्यांनी प्रश्नांचे बरोबर आकलन होण्यासाठी या विवेचनाची उजळणीची गरज भासते.(१७)

आझादांनी आपल्या भाषणात म्हटले होते की, जातीयवादाचा प्रश्न चूक गृहितकृत्यांवर आधारलेला असल्यामुळे अवास्तव आहे. भारतीय राजकारणात मुस्लीम समाज अल्पसंख्य आहे असे म्हणण्यासारखे दुसरे असत्य नाही. अल्पसंख्य म्हणजे केवळ संख्येने लहान असणारा गट व म्हणून त्यास खास संरक्षण असा या कल्पनेचा राजकीय अर्थ होत नाही. अल्पसंख्य याचा खरा अर्थ एखादा गट संख्येने अत्यल्प असून अवतीभवतीच्या मोठया गटपासून

आपला बचाव करण्याची क्षमता त्यांच्या अंगी नसणे असा होतो. यादृष्टिने पाहू लागल्यास भारतात मुस्लीम आठ ते नऊ कोटींच्या घरात असून देशाच्या विविध भागात ते पसरलेले आहेत. अनेक ठिकाणी त्यांची संख्याही भरपूर असेल तेव्हा आपण अल्पसंख्यांक आहोत या भयगंडाने पछाडण्याचे मुस्लीम समाजाला काही कारण नाही,' असे मौलाना आझादांचे मुस्लीम समाजाविषयी मत होते.(१८)

आझादांचे विचार धर्मकारण असो किंवा राजकारण याबाबतीत स्वतंत्र प्रज्ञेचे त्यातून दर्शन होते. वैचारिक बंडखोरी हा त्यांचा स्वभावगुण होता. आपल्या क्रांतीकारी भाषेतून इस्लामचा नवा उदारमतवादी अर्थ काढून फार मोठया परंपरेला त्यांनी धक्का दिला. जातीय समस्येचे योग्य आकलन होण्यासाठी मुस्लिमांकडे राजकीयदृष्टया अल्पसंख्य जमात म्हणून पाहणे चूक आहे हे दाखवून देवून मुस्लिमांचे लांगूनचालन करणे म्हणले सेक्युलॅरिझम असे समजणाऱ्या पुरोगाम्यांच्या डोळयावरचा पडदा फाडला. आझादांनी हिंदु-मुस्लिम ऐक्यासाठी तळमळीने चिंतन केले. आजच्या काळातही राजकारण असो अथवा समाजकारण, अर्थकारण इत्यादी क्षेत्रात मुस्लिम स्वत:चे अस्तित्व मानतात व आपण त्या क्षेत्रात अल्पसंख्य असल्याचा बाऊ करतात. आधुनिकतावादी विचाराला अगदी नाकी नऊ करु सोडतात. तथाकथित सेक्युलरवादी राजकीय पक्षही याच भावनेला खतपाणी घालून आजही हिंदू मुस्लिम दुरावा निर्माण करीत आहेत. यासंबंधी डॉ. लोहिंच्या मते, "मुसलमानांना हिंदूंच्या अधिक निकट आणण्याच्या कामी अथवा तेवढीच मूळ बीजे त्यांच्या मनातून नष्ट करण्याच्या कामी स्वतंत्र भारतात फाळणीनंतर काहीही केले गेले नाही. निव्वळ मते उपटण्याची अभिलाषा व बहुरंगी समाजाचे तत्त्वज्ञान ही या अपराधाची कारणे होत ही प्रवृत्ती सर्व राजकीय पक्षांत विशेषत: सेक्युलॅरिझमचा टेंभा मिरविणाऱ्या सर्व पक्षांत आढळते.(१९)

शिक्षणाच्या संदर्भात आझादांची दूरदृष्टी वाखाणण्याजोगी आहे. प्रौढ साक्षरतेचा कार्यक्रम त्यांनी मांडला. साक्षरतेचे प्रमाण खूप कमी असल्याने प्रौढ साक्षरतेचा कार्यक्रम खूप उपयुक्त सिध्द झाला असता. मूलभूत संशोधनाची

महत्त्व त्यांनी सांगितले. साहित्य, संगीत, नाटक, नृत्य, काव्य, सृजनात्मक लेखन सर्वांचा विकास करणारे शिक्षण दिले पाहिजे. तांत्रिक शाळा, कृषिक्षेत्रे, ग्रंथालये यांच्या संदर्भात धाडसी कार्यक्रम आझादांकडे होते. परंतु शिक्षणावरील निधी केवळ दोन टक्के एवढाच होता. आझादांना संगीतात रुची होती. शिक्षणाद्वारे त्यांना संगीतप्रकार करावयाचा होता. ते स्वतः सतार उत्तम वाजवीत. ताजमहालजवळ चांदण्या रात्री तासन्तास ते सतार वाजवीत.(२०)

**आझादांची फाळणीविषयक भूमिका :**

भारतीय राजकारणातील सर्वांत कटूता आणि विवाद्य विषय भारताच्या फाळणीचा आहे. मौलाना आझादांचा संबंध या विषयाशी अगदी जवळचा होता. भारतात राहणाऱ्या दोन मोठया जमाती - त्यातली एक बहुसंख्यांक व दुसरी अल्पसंख्यांक राष्ट्रांचे स्वरुप धारण करु शकतील काय? हा मुख्य विषय फाळणीच्या मुळाशी होता. हजारो वर्षे जर या जमातील एकत्र राहू शकतात तर स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी का एकत्र राहू नये? हा प्रश्न उपस्थित होतो.

मौलाना आझादांनी फाळणीच्या तत्वाला विरोध केला. त्यांच्या मते, पाकिस्तानच्या निर्मितीमुळे भारतावर दूरगामी परिणाम काय होतील याचाच एक भारतीय म्हणून व फाळणीनंतर प्रामुख्याने मुस्लिमांचे भवितव्य काय असेल? याचा एक मुस्लिम म्हणून सर्व बाजूने विचार करुन मी या निर्णयाप्रत आलो आहे की पाकिस्तानची योजना ही पराभूत प्रवृत्तीचे लक्षण आहे.(२१)

खुद्द गांधीजींनीदेखील एक निखळ राष्ट्रवादी नेतृत्व म्हणून आझादांची प्रतिमा जास्तीत जास्त बळकट होईल असे मुत्सद्दी प्रयत्न केले नाहीत. गांधींना आझाद व जीना या दोहोंत आझाद नक्कीच जवळचे होते. परंतु गांधींनी राजकारणात अशी काही पावले उचलली की त्यामुळे मुस्लिम मनावरीती जीनाचे नेतृत्व ठळक होत गेले. आझादांनी याविषयी आपली नाराजीही व्यक्त केली होती. खरे पाहता, आझादच खऱ्या अर्थाने मुसलमानाचे हितकर्ते होते; जीना नव्हे! परंतु गांधींनी राष्ट्रवादी मुसलमानाचे नेते म्हणून

दुसऱ्याच कोणाला तरी मान्यता दिली. गांधींनी मुस्लिमांमध्ये प्रथम अली बंधूंना तर नंतर डॉ. अन्सारींना महत्त्व दिले. आझाद एक बुध्दीवादी गृहस्थ होते. त्यांनी कधीही राजकारणात धर्म आणला नाही. ते कधीही मुस्लिम राजकारण खेळले नाहीत, तर एक भारतीय म्हणून त्यांनी काम केले. मुस्लिमांवर पकड घेण्यासाठी गांधींना आझादांचा फारसा उपयोग होऊ शकणार नव्हता आणि केवळ तत्कालीन राजकारणाच्या लाभासाठी गांधींनी राष्ट्रीय प्रवृत्तीच्या आझादांच्या तुलनेत जातीयवादी जीनांना जनमानसात स्थान मिळवून दिले.(२२)

मौलाना आझादांच्या धर्मविषयक दृष्टीकोनाबद्दल मुस्लिम समाजात भरपूर आदर होता. परंतु मौलाना आझाद अपेक्षाकृत मुस्लिम संघटन करु शकले नाहीत. कारण आझादांचा राजकीय दृष्टिकोन त्यांच्या धर्मविषयक दृष्टिकोनाचाच परिपाक होता. त्यांचा अखंड भारतावर, हिंदू-मुस्लिम ऐक्याची तळमळ, मुस्लिमांच्या अलसंख्य प्रवृत्तीकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि आधुनिकतावादाची कास धरणारा होता. या सर्व बार्बींचा समावेश त्यांनी इस्लामचा उदारमतवादी अर्थ लावल्यामुळेच जन्माला आल्या होत्या.

आझादांनी फाळणी टाळण्याचा प्रामाणिक आणि निकराचा प्रयत्न केला; कारण फाळणीत हिंदू आणि मुसलमान दोघांचे अहित होतेच परंतु फाळणी स्वीकारण्यात भारताच्या वैभवसंपन्न वारशालाही नकार होता. फाळणीमुळे मुसलमानांचे अधिक नुकसान आहे याचा अंदाज त्यांना बांधता आला. कॅबिनेट मिशनची योजना आणि कॉंग्रेसने तयार केलेली योजना यामध्ये साम्य असल्याने ती योजना ठराव स्वीकारावी असे मत आझादांनी मांडले. परंतु त्यांचा ठराव बहुमताने मंजूर झाला तरी समाजवाद्यांनी त्याला जोरदार विरोध केल्याचे ते नोंदवितात. पुढे पंडित जवाहरलाल नेहरुंनी १० जुलैला पत्रकार परिषद घेऊन कॉंग्रेसने फक्त घटना समितीत यावयाचे मान्य केले असून कॅबिनेट मिशन योजनेत फेरफार करण्याचा अधिकार तिला राहील असे सांगून खळबळ उडवून दिली. मौलाना आझादांचे मत असे आहे की, पंडित नेहरुंनी ही चूक केली. आझादांची काही चूक झाली असे नव्हते. कारण कॉंग्रेस वर्किंग कमिटीला पुन्हा

पूर्वीच्याच निर्णयाप्रत यावे लागले. फक्त वार्ताहर परिषदेचा उल्लेख टाळावा लागला. कारण अध्यक्षांच्या प्रतिष्ठेचाही प्रश्न होता! जीनांनी मात्र नेहरुंचेच मत खरे असल्याची बतावणी केली. पंडित नेहरुंनी जीनांशी वाटाघाटी करण्याचा प्रयत्न केला पण त्यांना सफलता मिळाली नाही.(२३)

आझादांनी विभाजन वाचविण्याचे काही भावनाविवश प्रयत्न केले. गांधीजींना जेव्हा सुगावा लागला की, नेहरु आणि पटेल सत्तेच्या दाराशी काही भयानक योजना आखत आहेत तेंवहा ते तातडीने दिल्लीला गेले आणि त्यांनी आझादांना विचारले "ते त्यांच्या (गांधीजी) बरोबर राहतील की नेहरु आणि पटेलांसारखी साथ सोडतील?" आझादांच्या डोळयात अश्रू तरळले आणि ते गांधीजींना म्हणाले, "ज्या पध्दतीने नेहरुंनी शरणागती पत्करली ती अतिशय क्लेषदायक होती. तुमच्याकडूनच आता काही आशा आहे. तुम्ही विभाजनाविरुध्द उभे राहिलात तर आपण अजूनही भारताला वाचवू शकू. पण जर तुम्ही निमूटपणे हे सहन केले तर भारत अखंड राहणार नाही." गांधीजी उत्तरले, "हा काय प्रश्न आहे! काँग्रेसला फाळणी मान्य करण्यासाठी माझ्या प्रेतावरून जावे लागेल. जोपर्यंत मी जीवंत आहे, तोपर्यंत फाळणीच्या योजनेला मी कधीच मान्यता देणार नाही."(२४)

गांधीजी लॉर्ड माऊंटबॅटन यांना २ मार्च १९४७ रोजी भेटले. त्यावेळी जवळजवळ दोन तास सरदार पटेल व माऊंटबॅटन यांच्यात चर्चा झाली होती. या बैठकीविषयी आझादांना काहीही माहिती नव्हती. परंतु त्यानंतर गांधीजींना आझाद भेटावयास गेले त्यावेळी गांधीजींच्या फाळणीविषयक भूमिकेबाबत आझादांच्या मनात संभ्रम निर्माण झाला."(२४)

गांधीजींनी फाळणीच्या मागणीला अखेर मान्यता दिली. यासंबंधी आझाद लिहितात, देशाची अखंडता राखण्यासाठी गांधीजींनी जीनांना सरकार बनविण्याचा अधिकार द्यावा असे माऊंटबॅटनना सुचविले होते. माऊंटबॅटन यांनी या गोष्टीचा स्वीकार केला होता. परंतु नेहरु व पटेलांनी या सल्ल्याचा कडाडून विरोध केला. गांधीजींच्या या सूचनेचा प्रस्ताव माऊंटबॅटनला परत

घ्यावा लागला. आझादांनी याविषयी लिहिले आहे की, गांधीजींनी या गोष्टीची त्यांना माहिती दिली आणि सांगितले की फाळणी ही आता आवश्यक आहे असे वाटते.(२५)

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात ज्या विविध व्यक्तिंनी फुल ना फुलाची पाकळी अर्पण केली व भारताच्या शिल्पकार्यास हातभार लावला. त्यात मौलाना अबुल कलाम आझाद यांचे नांव विसरता येणार नाही. आझाद हे केवळ राजकीय क्षेत्रातच वावरले असे नाही तर एक विचारवंत व चिंतनशील व्यक्ती या नात्यानेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा वारसा मागे सोडला आहे हे मोठया अंत:करणाने कोणत्याही भारतीयास मान्य करावे लागेल.

# संदर्भसूची


१ अब्दुल कवी दस्तवी - अबुल कलाम आझाद (अनुवादक : जानकीप्रसाद शर्मा) साहित्य अकादमी, नवी दिल्ली, १९८८, पृ. ६ ते ९.

२ पूर्वोक्त... ९.

३ गुब्बारे खातिर (सं) - मलिक राम - आझाद, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, २००४, पृ. १४ ते १७.

४ पूर्वोक्त... १७.

५ नागोरी एस् एल्, नागोरी जितेश - मौलाना अबुल कलाम आझाद, पोईन्टर पब्लिशर्स, जयपूर, १९९६, पृ. ३५.

६ देसाई महादेव - मौलाना अबुल कलाम आझाद, बायोग्राफीकल मेम्वॉ, दुसरी आवृत्ती, आग्रा, शिवलाल अगरवाल, १९४६, पृ. ४६-४८.

७ पूर्वोक्त... ४८.

८ वकील अलीम - मौलाना आझाद धार्मिक आणि राजकीय विचार, प्रतिभा प्रकाशन, पुणे, २००५, पृ. ६५ ते ७०.

९ पूर्वोक्त... ६९-७०.

१० अब्दुल कवी दस्तवी - अबुल कलाम आझाद (अनुवादक : जानकीप्रसाद शर्मा) साहित्य अकादमी, नवी दिल्ली, १९८८, पृ. ४२.

११ Kashyap Subhash - Moulana Abul Kalam Aazaad, National Publication House, New Delhi, 1989, p. 73.

१२ जोगुलवार भूषणकुमार-मौलाना आझाद व हिंदू मुस्लिम ऐक्य विचारशलाका, (संपादक नागोराव कुंभार), जानेवारी-मार्च १९९७, पृ. ५७-६३.

१३ पूर्वोक्त... ५९.

१४ पूर्वोक्त... ६२.

१५ नागोरी एस् एल्, नागोरी जितेश - मौलाना अबुल कलाम आझाद, पोईन्टर पब्लिशर्स, जयपूर, १९९६, पृ. ८६.

१६ वकील अलीम - मौलाना आझाद धार्मिक आणि राजकीय विचार, प्रतिभा प्रकाशन, पुणे, २००५, पृ. २९४ ते २९६.

१७ पूर्वोक्त... २९५.

१८ पूर्वोक्त... २९६.

१९ लोहिया राम मनोहर - भारतीय फाळणीचे गुन्हेगार (अनुवादक श्रीपाद केळकर), प्रेस्टिज प्रकाशन, पुणे, १९६८, पृ. ९२.

२० देसाई महादेव - मौलाना अबुल कलाम आझाद, बायोग्राफीकल मेम्वॉ, दुसरी आवृत्ती, आग्रा, शिवलाल अगरवाल, १९४६, पृ. १०५.

२१ वकील अलीम - मौलाना आझाद धार्मिक आणि राजकीय विचार, प्रतिभा प्रकाशन, पुणे, २००५, पृ. ३२४.

२२ भांडारकर शांता - स्वातंत्र्यांच्या जन्मकाळी, ओरिएंट ॲण्ड लॉगमन्स लि, मुंबई, १९६२, पृ. १५३.

२३ पूर्वोक्त... २४.

२४ Azad Moulana Abul Kalam, India Wins Freedom, Orient Logmons Ltd., Bombay, 1959, p. 259.

२५ पूर्वोक्त... २६०.